# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अर्थ प्रशासन विभाग

---

वाचा:-१) शासन निर्णय : कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक AUG-३७१९/CR-४१/६-A, दिनांक: १२ ऑगस्ट,२०२१.

२) कुलसचिव, प्रशासकीय आदेश क्र.No.BBA/7Pay/Academic Staff Member/२०२१, Dated: २३/०८/२०२१.

३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.विप्रवि/अंदाज/भाकृअप/७वे वेतन/२०२१-१२२/७३३, दिनांक: १८ ऑगस्ट,२०२१.

## परिपत्रक

जा.क्र.अप्रवि/अंदाज/७-वेतन आयोग/शिक्षक /२०२१/ ७६४ . दिनांक: २५ ऑगस्ट, २०२१.

शासन निर्णय : कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक AUG-३७१९/CR-४१/६-A, दिनांक: १२ ऑगस्ट,२०२१ अन्वये डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, संलग्न कृषि महाविद्यालये यांचे अधिनस्त नियमीत आस्थापणेवरील पुर्णवेळ कार्यरत शिक्षकवर्गीय अधिकारी /कर्मचा-यांना सातवा वेतन आयोगांतर्गत सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्याबाबत यापूर्वी संदर्भ क्र.३ अन्वये आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचना देण्यात आल्या होत्या.

सद्य:स्थितील शासन निर्णयामधील प्रस्तावित मुद्यांच्या अनुषंगाने सुधारीत वेतन निश्चितीबाबत सविस्तरपणे प्रकरणपरत्वे वेतन निश्चिती कशी करावी याबाबतच्या मार्गदर्शक सुचना खालीलप्रमाणे देण्यात येत असून, सदर मार्गदर्शक सुचनांनुसार वेतन निश्चिती व पडताळणी करण्यात यावी.

**कृषि विद्यापीठातील सध्या कार्यरत व दिनांक १.१.२०१६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांचे सातव्या वेतन आयोगांतर्गत करावयाच्या वेतन निश्चितीबाबत मार्गदर्शक सुचना**

१) दिनांक ०१/०१/२०१६ रोजी विदयमान वेतन श्रेणीमध्ये असलेले मुळवेतन (वेतन +एजीपी) यांस २.५७ ने गुणून येणारे वेतन संदर्भीय शासन निर्णयातील परिशिष्ट -। मध्ये विदयमान वेतनश्रेणी आणि एजीपी चे रकान्यामध्ये नमूद केल्यानुसार निश्चित करण्यात यावे.

विदयमान वेतन श्रेणीमध्ये असलेले मुळवेतन (वेतन + एजीपी) यांस २.५७ ने गुणून येणारे वेतन परिशिष्ट-। सारणीतील प्रारंभिक वेतनापेक्षा कमी असल्यास सारणितील प्रारंभिक वेतनावर निश्चिती करण्यात यावे.

२) उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय, परिच्छेद १९.० अन्वये दिनांक ०१/०१/२०१६ ते दिनांक ३१/०३/२०१९ या कालावधीतील वेतन आयोगाचे अनुज्ञेय थकबाकीची रक्कम महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन अधिसुचना क्रमांक वेपुर २०१९/प्र.क्र.सेवा-९, दिनांक ३०/०१/२०१९, वित्त विभाग, शासन अधिसुचना क्रमांक वेपुर २०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दिनांक २०/०२/२०१९ मध्ये नमूद तरतुदीनुसार पुढील पाच वर्षात पाच समान हप्त्यात प्रदान करावी तसेच वेतननिश्चितीसंबंधी स्पष्टीकरणबाबत शासन निर्णय क्र.वेपुर -२०१९/प्र.क्र.१५/सेवा-९, दिनांक १४ मे,२०१९ चे अवलोकन करावे.

तसेच दिनांक ०१/०४/२०१९ ते ३१/०७/२०२१ या कालावधीतील वेतन आयोगाचे अनुज्ञेय थकबाकी रक्कम रोखीने देय राहील.

३) उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयातील परिशिष्ट क्र.२० नुसार सहयोगी प्राध्यापकांना मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे, अशा याचिकाकर्त्या सहयोगी प्राध्यापकाच वेतन निश्चिती तुर्त करण्यात येऊ नये त्यांना विदयमान दराने वेतन अदा करावे . ( सुलभ संदर्भाकरीता याचिका कर्त्याची यादी वेतन पडताळणी समितीकडे उपलब्ध करुन देण्यात आली आहे)

४) शासन निर्णय दिनांक १२/०८/२०२१ मधील मुद्दा क्र. २१ अन्वये उपरोक्त कर्मचा-यांची नियुक्ती ही संबंधित पदावर कायदेशिर दृष्टया करण्यात आलेली असल्याबाबत नियुक्ती प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.

५) भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचेकडील अर्थसहाय्यीत योजनांमध्ये कार्यरत शिक्षकवर्गीय अधिकारी /कर्मचारी यांना वित्तीय वर्ष २०२१-२२ मध्ये प्राप्त झालेल्या वेतन अनुदानांचे मर्यादेत सातव्या वेतन आयोगानुसार वेतन अदा करावे.

६) उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय, परिच्छेद ८ नुसार पी.एचडी आणि इतर उच्च शैक्षणिक पात्रता धारण करणा-या शिक्षकवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना त्यांनी नियुक्तीचे वेळी किंवा सेवेत असतो विहीत शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याबददल प्रोत्साहनात्मक आगाऊ वेतनवाढी देण्याची तरतूद रदद करण्यात आलेली आहे. त्यामुळे शासन निर्णयाप्रमाणे दिनांक ०१/०१/२०१६ नंतर अशा आगाऊ वेतनवाढी देण्यात आलेल्या असल्यास त्या वेतननिश्चितीसाठी ग्राहय धरु नयेत.

७) संदर्भीय शासन निर्णयातील परिशिष्ट -३ नुसार विहीत हमीपत्र, करारनामा व विकल्प भरुन घ्यावेत.

८) सहाव्या व सातव्या वेतन आयोगाच्या शासन निर्णयानुसार एजीपी -६०००/- ते ७०००/- व ७०००- ते ८०००/- हयामध्ये बदल झाल्यास मानिव वेतनवाढ देय करण्यात यावी.

९) दिनांक १/१/२०१६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांचे वेतनश्रेणी मध्ये ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती करण्यात याव्यात व पडताळणी मोहीमेकडून प्रकरणे पडताळणी करुन घ्यावेत व अनुदान उपलब्धतेनुसार थकबाकीची रक्कम त्यांना अदाईची कार्यवाही करावी.

१०) सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी वरील सुचनांचे काटेकोर पालन करुन त्यांचे अधिनस्त कार्यरत शिक्षकवर्गीय अधिका-यांची वेतननिश्चिती दिनांक ०१/०१/२०१६ रोजी निश्चित करावी. त्या आधारे माहे ऑगस्ट-२०२१ चे वेतन निर्धारीत करुन वेतन देयके **दिनांक ३१/०८/२०२१** पर्यंत वेतन व लेखाधिकारी कार्यालय, अकोला/नागपूर येथे सादर करण्याची दक्षता घ्यावी.

नियंत्रक
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

प्रत:-
१.विभाग प्रमुख (सर्व)/ कार्यालयीन प्रमुख (सर्व)/ आहरण व संवितरण अकधकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.
२. वेतन व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला / नागपूर यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.
३. प्रायार्च ....................................................................................
४. नियंत्रण अधिकारी (सर्व)..........................................................
५.कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
६. प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसारणाकरीता.

प्रतिलिपी:-
कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना मा.कुलगुरु यांच्या माहिती करीता सादर.

नियंत्रक